महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र .०२२-२२७९४१९५ Email : ud10-urban@mah.gov.in

---

क्र.सिआयडी-३३२२/९१३/प्र.क्र.१५५/नवि-१० दि.१९.०८.२०२४

**तातडीचे / कालमर्यादा**

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको),
निर्मल, नरिमन पॉईन्ट, मुंबई - ४०० ०२१.

**विषय : सिडको महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या "अभय योजनेस (Amnesty Scheme)" मुदतवाढ देणेबाबत.**

संदर्भ : १) शासन पत्र समक्रमांक, दि.१२.०१.२०२४,दि.१५.०३.२०२४
२) शासन पत्र क्र.सिआयडी-३३२३/(ई-७०७४९६) /प्र.क्र.२१६/नवि-१०, दि.१५.०३.२०२४

महोदय,

नवी मुंबई व परिसरातील सिडकोने भाडेपट्टयाने वितरीत केलेल्या जमिनीच्या विकासनाच्या अनुषंगाने बांधकाम व्यवसायाशी संबंधित अडचणी व इतर बाबीसंदर्भात निर्णय घेण्यासाठी गठीत समितीच्या शिफारशीं व सिडको संचालक मंडळाचे ठराव विचारात घेऊन शासनाच्या संदर्भीत पत्रांन्वये अभय योजनेच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत. सिडको महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या "अभय योजनेस (Amnesty Scheme)" मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत आपणास कळविण्यात येत आहे.

१. नवी मुंबई प्रकल्प तसेच शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठी अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (Additional Lease Premium) तसेच सेवा शुल्क (Service Charge) व विकास शुल्क (Development Charge) मध्ये ५०% सवलत देण्यासंदर्भात राबविण्यात येणा-या अभय योजनेंतर्गत अर्जदारास अर्ज करण्यास दि.१५.०९.२०२४ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.
२. अभय योजनेंतर्गत प्राप्त होणा-या अर्ज/ निवेदनांवर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसात नियमोचित तपासणी करुन सिडकोमार्फत संबंधितांना रकमेचा भरणा करणेबाबत कळविणे बंधनकारक राहील.
३. सिडकोकडून कळविण्यात आल्यानंतर पुढील १५ दिवसाच्या आत अर्जदाराने रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील.
४. सदर अर्जावर भुखंडाचा क्रमांक नमुद केलेला असल्यास अर्ज परिपुर्ण समजण्यात यावा.

आपला,

(लक्ष्मीकांत जाधव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

मुख्य प्रशासक ( नवीन शहरे), सिडको, छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner